# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.

Website: www.dvet.gov.in E-mail: - desk७@dvet.gov.in Phone No. २२६२०६०४/२९३.


**महत्वाचे**

क्रमांक : ०७/सीटीएस/प्रवेशप्रक्रीया/२०१७/324

दिनांक-30 जून, २०१७

<u>परीपत्रक:</u>

विषय : व्यवसाय शिक्षण - माध्यमिक स्तर योजनेअंतर्गत व्यवसाय शिक्षण हा मुख्य विषय घेऊन इयत्ता १० वीची मार्च, २०१७ ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील व्यवसाय शिक्षणाकरिता प्रवेश प्रक्रीयेबाबत.

संदर्भ :

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-३३१५/प्र.क्र.१७/व्यशि-३ दिनांक १४ मे, २०१५

२. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान यांचे पत्र क्र.रामाशिअ/व्य.शि./२४/(६७/१६)/२०१७/९३७ दि.२७ जून, २०१७

राज्यातील प्रवेशप्रक्रीयेदरम्यान संदर्भिय शासन निर्णयातील मुद्या क्र.५.१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मंडळाकडुन जो उमेदवार तांत्रिक विषय वा व्यावसायिक अभ्यासक्रम घेऊन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहे अशा उमेदवारांना १०% आरक्षणाची तरतुद देण्यांत आलेली आहे.

मा. राज्य प्रकल्प संचालक यांचेकडुन प्राप्त संदर्भिय पत्रान्वये (२) कळविण्यांत आल्याप्रमाणे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी व्यतिरिक्त इतर माध्यमाच्या विद्यार्थ्यांना व्दितीय भाषेऐवजी व्यवसाय विषय निवडण्यांचे व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना भाषा २ अथवा भाषा ३ ऐवजी व्यवसाय विषय निवडण्यांची तसेच उपरोक्त पर्यायांसोबतच सर्व माध्यमाच्या विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्र या विषयाऐवजी व्यवसाय विषय निवडण्यांची देखील मुभा आहे असे कळविण्यांत आले आहे.

त्यासाठी खालील तक्यातील विषय संकेतांक क्र.८१ व ८२ नुसार अनुक्रमे Multi Skill व Automobile हे तांत्रिक विषय घेवून इयत्ता १० वी उत्तीर्ण उमेदवारांचा संदर्भिय शासन निर्णय क्र.०१ मधील मुद्दा क्र.५.१ मध्ये उल्लेख केलेल्या १०% आरक्षणात अंतर्भाव करण्यांत यावा. तथापि, विषय संकेतांक क्र.८३ ते ८६ मध्ये देण्यांत आलेले व्यवसाय हे तांत्रिक (Technical) स्वरुपाचे नसल्याने प्रवेश अर्ज करतेवेळी Step-५ Entry Qualicfication

Details मध्ये देण्यांत आलेल्या विषयनिहाय प्राप्त व कमाल गुणांच्या तपशिलांत त्या व्यवसायांसाठी असलेले कमाल व प्राप्त गुण हे ज्या भाषेसाठी तो व्यवसाय वैकल्पिक आहे तेथे नमुद करावेत.

| Sr.No | State Board Subject Code | Trade Name | प्रवेश अर्जात Step ५ मध्ये विषय निहाय गुणांच्या तपशिलात गुण खालील विषयांसमोर नोंदवावे. |
|---|---|---|---|
| १ | ८१ | Multi Skill | तांत्रिक विषय |
| २ | ८२ | Automobile | |
| ३ | ८३ | Retails | ज्या भाषेसाठी वैकल्पिक म्हणून सदर विषय घेण्यांत आलेला आहे. |
| ४ | ८४ | Healthcare | |
| ५ | ८५ | Beauty & Wellness | |
| ६ | ८६ | Physical Sports and Education | |

वरील प्रमाणे आवश्यक सुचना उमेदवारांना देण्यांसाठी संस्थेच्या आवारात दर्शनी भागात सुचना फलक लावण्यांत यावेत.

Jadhav

(अ.म.जाधव)
प्र.संचालक

प्रत :

१. मा.राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, जवाहर बाल भवन, २ रा मजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड(पश्चिम) मुंबई-०४
२. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई / पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
३. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी.
४. प्राचार्य सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्था.यांनी उमेदवारांच्या निर्दशनास सदर बदल येईल यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करावेत.
५. सदर बाबत आवश्यक माहिती प्रवेश संकेतस्थळावरील (www.admission.gov.in ) मुखपृष्ठावर उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

# राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान

पढ़े चलो, बढ़े चलो
RASHTRIYA MADHYAMIK SHIKSHA ABHIYAN

(केंद्र - राज्य शासन योजना : राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, अपंग समावेशित शिक्षण(माध्य.स्तर)माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान,मुलींचे वसतिगृह,व्यवसाय शिक्षण)

जा.क्र. रामाशिअ/व्य.शि./ २५/(67/16)/2017/937 दिनांक: २७ जून -२०१७

प्रति,

**संचालक,**
**व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,**
**मुंबई**

**विषय: व्यवसाय शिक्षण- माध्यमिक स्तर योजनेअंतर्गत व्यवसाय शिक्षण हा मुख्य विषय घेऊन इयत्ता १० वीची मार्च, २०१७ ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या पुढील व्यवसाय शिक्षणाकरिता प्रवेश प्रक्रीयेबाबत.**

**संदर्भ** : १. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक २१ ऑगस्ट,२०१४

२. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय दिनांक २६ सप्टेंबर, २०१६.

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भांकीत शासन निर्णय क्र. १ नुसार प्रकल्प मान्यता मंडळाच्या दिनांक ३० जून, २०१५ च्या इतिवृत्तानुसार मान्यता दिलेल्या राज्यातील निवडक शाळांमध्ये व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून इयत्ता ९वी मध्ये मुख्य विषय म्हणून सुरू करण्यात आले आहेत.

उपरोक्त संदर्भांकीत शासन निर्णय क्र. २ नुसार इंग्रजी व्यतिरिक्त इतर माध्यमांच्या विद्यार्थ्यांना द्वितीय भाषेऐवजी व्यवसाय विषय निवडण्याचे व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना भाषा २ अथवा भाषा ३ ऐवजी व्यवसाय विषय निवडण्याची तसेच उपरोक्त पर्यायांसोबतच सर्व माध्यमाच्या विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्र या विषयाऐजी व्यवसाय विषय निवडण्याची देखील मुभा आहे.

सदर शाळांमधील विद्यार्थ्यांनी व्यवसाय शिक्षण विषय घेवून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये इयत्ता १०वी ची राज्य मंडळाची परीक्षा दिली आहे. या विद्यार्थ्यांना राज्य मंडळातर्फे वितरीत करण्यात आलेल्या गुणपत्रिकांमध्ये खालील विषय संकेतांकांनुसार गुण दर्शविण्यात आले आहेत.

| Sr. No. | State Board Subject Code | Trade Name | Job Role |
|---|---|---|---|
| 1 | 81 | Multi Skill | Multi Skill Foundation Course |
| 2 | 82 | Automobile | Automobile Service Technician |

Imp. D-07 urgent. Issue a circular. 22/6/17


## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

**मुख्य कार्यालय** : जवाहर बाल भवन, दुसरा मजला, नेताजी सुभाष मार्ग,चर्नी रोड(पश्चिम), मुंबई-४०० ००४,दूरध्वनी:०२२-२३६३९३०५/०६
**फॅक्स** : ०२२-२३६३९३०५ **http** : //www.rmsaindia.org.in **e-mail** : rmsamaharashtra@gmail.com
**उप कार्यालय** : १७,डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, म.रा. परीक्षा परिषद परिसर, पुणे-४११ ००१, **दूरध्वनी**: ०२०-२६०५५९५
**http** : //www.rmsaindia.org.in **e-mail** : rmsapune1@gmail.com / rmsaiedss@gmail.com

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 83 | Retail | Sales Associate |
| 4 | 84 | Healthcare | General Duty Assistant |
| 5 | 85 | Beauty & Wellness | Assistant Beautician |
| 6 | 86 | Physical Sports and Education | Physical Trainer |

वरील संर्भांकित शासन निर्णयातील अनु. ५.क नुसार व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम घेऊन इयत्ता १०वी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे लाभ मिळण्याबाबत उल्लेख केलेला आहे,

अ. शासकीय/अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये २५% आरक्षण.

ब. शासकीय व अशासकीय तंत्र निकेतनमध्ये १५% आरक्षण.

क. उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये २५% आरक्षण.

ड. द्वीलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमामध्ये २५% आरक्षण (NVEQF/NSQF सुधारीत स्तराप्रमाणे)

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशाच्या ऑनलाईल अर्जामध्ये माहीती भरत असताना विद्यार्थ्यांना सदर व्यवसाय शिक्षण विषय पर्यायी विषय म्हणून दिसून येत नाहीत. तरी, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून व्यवसाय आधारीत अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रीयेदरम्यान उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णयानुसार प्रवेश प्रक्रीया राबविण्यात यावी व त्यानुसार आवश्यक सुधारणा ऑनलाईल अप्लिकेशन मध्ये करण्यात यावी ही विनंती.

**(डॉ. सुवर्णा खरात)**
**राज्य प्रकल्प संचालक**

प्रत: १. **मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.**

२. **डॉ. रविंद्र बाळापूरे, सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, औरंगाबाद तथा सहसंचालक, रा.मा.शि.अ., पुणे.**